Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80

NKGSB Co-operative Bank Ltd. (Multi-State Scheduled Bank)

SINCE 1917

108 Years of Banking Excellence

SMART, SAFE & SECURE WAY TO GROW YOUR WEALTH....

INVEST IN FIXED DEPOSIT

7.30% p.a. FOR SENIOR CITIZENS | **7.00% p.a.** FOR OTHERS

*Terms & Considitions Apply.

Interest Rates w.e.f. 26.01.2026

* Interest Rates are subject to change.

Existing Customers can book their NKGSB Bank's Fixed Deposit
Anytime.... Anywhere.... through our Quick Mobil App & Internet Banking.

Convert Your Gold into Financial Strength

LOAN AGAINST GOLD ORNAMENTS

* Terms & Condition apply.

LOW PROCESSING FEE | QUICK LOAN DISBURSAL | *INTEREST RATE @ 0.71% pm onwards | FLEXIBLE REPAYMENT OPTION

YOUR JEWELLERY WILL BE SAFE WITH US

* Linked to loan amount , Terms & Conditions Apply.

FOR MORE DETAILS VISIT YOUR NEAREST BRANCH OR CALL ON TOLL FREE NO:18002671917

हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक प्र. मो. कसबेकर यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.

"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

मुखपत्रिका

कार्यालय फोन : ०२२ – ४७४९ ८२५९ / ९८६७६ ७४८६४

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

|| कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ||
|| मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि ||

|| देव बरे करु ||

क्रमांक ३ वर्ष : ४८ ऑक्टोबर–डिसेंबर २०२६

BOOK PACKET मूल्य रु. ५

Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80

TO,

From : The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

ज्ञातीचे दानशूर व्यक्तिमत्व

श्री. अरूण कसबेकर,
ज्ञातीचे दानशूर व्यक्तिमत्व

गेल्या वर्षी वार्षिक स्नेहसंमेलनात एज्युकेशन सोसायटी तर्फे ऑनररी मेंबरशीप बहाल करून श्री अरूण कसबेकरजी यांना गौरविण्यात आले तेव्हांचा फोटो.

ठाणे मंचच्या कार्यक्रमात प्रसाद कसबेकर यांना जवळ घेताना श्री अरूण कसबेकरजी.

ठाणे मंचची अलिबाग सहल

अलिबाग सहलीचे
सगळे सभासद

देवदास नाडकर्णी आपली कविता प्रस्तुत करताना मध्यभागी बसलेल्या रिसॉर्टच्या ओनर शिल्पा जाधव व बाजूला बसलेले सुरेश पालेकर

रिसॉर्टमध्ये सायंकाळी
आरामात गप्पा मारताना

दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ आणि दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी

वार्षिक स्नेहसंमेलन २०२६

निमंत्रण पत्रिका

ज्ञातीतील सर्व बंधुभगिनींना नम्र विनंती आहे की आपण सर्वांनी ज्ञातीच्या येत्या वार्षिक स्नेहसंमेलनास उपस्थित राहून शोभा आणावी व कार्यक्रम यशस्वी करण्यास साहाय्य करावे.

: प्रमुख पाहुणे :

डॉ. गौरेश मधुसूदन पालेकर

(A wellknown Orthopedic Surgeon)

(त्यांचा परिचय मुखपत्रिकेच्या संपादकीय मध्ये दिला आहे.)

स्थळ : **तेंडुलकर हॉल, मोगल लेन,**

माहीम, मुंबई-४०० ०१६

दिनांक : रविवार २९ नोव्हेंबर २०२६, सायं. ४.१५ वाजता

कार्यक्रम

* स्वागत गीत
* संघ व एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांची भाषणे
* प्रमुख पाहुण्यांचे मनोगत

......मध्यंतर......

* विवाहाची सुवर्ण जयंती ओलांडणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा सत्कार.
* एज्युकेशन सोसायटी तर्फे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना श्रीमती निवेदिता यांच्या हस्ते बक्षिसे.

स्नेहसंमेलनासाठी वेगळे निमंत्रण पाठविले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

शिरीष दी. वाघ	**देवदास अ. नाडकर्णी**
कार्याध्यक्ष-संघ	**कार्याध्यक्ष-एज्युकेशन सोसायटी**

संपादकीय

प्रमुख पाहुण्यांची माहिती

यंदाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे डॉ. गौरेश पालेकर

यंदाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून संघ व एज्युकेशन सोसायटीने डॉ. गौरेश पालेकर यांना आमंत्रित केले आहे. डॉ. गौरेश पालेकर हे MS (ortho), DNB (ortho), D. Orthopedic, FCPS consultant Orthopedic Joint replacement Surgeon इतक्या साऱ्या उपाध्यांनी परिपूर्ण आहेत. डॉ. गौरेश पालेकर हे मुंबईतील प्रख्यात अति अवघड अशा फ्रॅक्चर्ससाठी, जॉइंट रिप्लेसमेंट सर्जरी आणि अत्याधुनिक कंबरेच्या हाडांच्या जोडणीसाठी गेल्या दोन दशकांवर कार्यरत आहेत. त्यांचे नांव अतिशय विश्वसनीय असे आहे की हाडांच्या कुठल्याही समस्येवर ते निष्णात गणले जातात.

ते श्री. मधुसूदन व श्रीमती मनिषा पालेकर यांचे सुपुत्र असून गिरगावातील भटवाडीमध्ये लहानाचे मोठे झाले आहेत.

त्यांनी ग्रँट मेडिकल कॉलेज मधून डॉक्टरी पदवी घेतली तर नंतर जे. जे. व नायर हॉस्पिटलशी संलग्न राहिले. मुंबईतील इतर अनेक हॉस्पिटलशी ते संलग्न आहेत. ते ह्या क्षेत्रात गोल्ड मेडलिस्ट आहेत. भारतभर त्यांनी हाडांचे निष्णात म्हणून उच्च पदव्या प्राप्त केल्या आहेत.

जगभरात नावाजलेल्या हाडांच्या डॉक्टरांमध्ये त्यांचे नाव फार वरचे आहे.

डॉक्टरी शिक्षण क्षेत्रात त्यांचे Total knee replacement operative Techniques हे जर्नल फार प्रसिद्ध आहे.

डॉ. गौरेश पालेकर हे गुडघा बदलाच्या शल्यचिकित्सेमध्ये रक्त संकलन पद्धती सुरु करणारे जगातील पहिलेच हाडांचे तज्ञ आहेत.

मिनीमल टिश्यू ट्रॉमा शल्य विशारद म्हणून ते प्रसिद्ध आहेत. एका दिवसात गुडघा बदल केल्यानंतरही पेशंटला चालवू शकणारे ते एकमेव डॉक्टर आहेत. ते अमेरिकेच्या नॅशनल ओस्टीओनेक्रोसिसचे सभासद आहेत. ते रुग्णांना प्राधान्य देणारे व त्यांच्या कलाने घेत योग्य व त्वरित उपाय करुन रुग्णाला भरोसा देणारे शल्य चिकित्सक आहेत. रुग्णांना आणखी कुठल्या पद्धतीने बरे करता येईल या साठी उत्तरोत्तर धडपडणारे ते निष्णात डॉक्टर आहेत.

अशी उच्च कोटीची व्यक्ती आपल्या जी.एस्.बी. ज्ञातीत आहे याचा आम्हाला प्रचंड अभिमान आहे.

- प्रसाद कसबेकर
संपादक.

=:=:=:=:=

Smt. Dr. Vaishali N. Dadkar (nee Shakuntala Mangesh Gandbhir) would be honoured by the NKGSB Sangh for the special outstanding achievements in her Academic and professional career.

She would be Awarded Honorary membership of NKGSB Sangh in the Sneh Sammelan to be held on 29th Nov 2026.

She also has confirmed and accepted the same.

Her brief and important details are,

1) She did MBBS (1967) and MD Pharmacology (1970) from Seth G. S. Medical College, University of Mumbai.
2) Taught MBBS Students at G. S. Medical College, L. T. Medical College and Dr. D. Y. Patil Medical College from 1967 to 2009 (42 years)
3) Taught MD Students at various Institutes from 1978 to 2009.
4) Had been a Faculty Member for U. G. Biomedical Course run in collaboration with DYP College and University of Central Lancashire, UK.
5) Was Scientific Advisor and Member of National Committee for International Union of Pharmacology (IUPHAR) from 1981 to 1984.
6) Was Member of Expert Study Group for Drug Combinations, appointed by FDA, Maharashtra from 1996 to 1998.
7) Travelled abroad as Member of Delegation sent by Indian National Science Academy to International Congress of Pharmacology at a) Tokyo 1981, b) London 1984 and c) Sydney 1987.

Apart from above, she has wide Research experience with 75 Publications.

She has been attending our Sneha Sammelans as well as Programs by Thane Manch.

She has recently donated Rs.1.50 Lakhs to Sangh and Rs. 0.75 Lakhs to Education society.

A proud and historic moment for Thane and AIPA !

Dr. Siddharth Wagle - an exceptionally talented dentist, accomplished cricketer, skilled table tennis player, and dynamic pickleball athlete - continues to inspire with his dedication and sporting excellence.

He has proudly become the first player from Thane to be selected to represent AIPA.

This Prestigious achievement marks a major milestone for Thane's growing pickleball community and inspires aspiring athletes across the region.

मीरा : अगो हिरा! तुगेल्या लग्नाक पंचवीस वर्सा जातात खंयन्ही! पार्टी बिर्टी आसा का ना?
हिरा : करता आशिल्लें गो पार्टी. पण माका मगेल्या आवयबापायली खूप याद येता. ती उरच्या जाय आशिल्ली ह्या वेळार.
मीरा : खरेंच. तांका सगळ्यांचेर, विशेषतः गरीबांचेर कितली माया आशिल्ली म्हणून सांगू! थांब. तांगेली कायमची याद दवरचो तुका एक सोपो उपाय सांगता.
हिरा : सांग, सांग. ताबडतोब सांग. वेळ घालवनाका.
मीरा : तूं तुगेल्या आवयबापायल्या नांवान संघाकडेन किमान पांच–स हजार रुपय दिल्यार तुकाच न्हय तर सगळ्यांक तांगेली कायमची याद रावतली. शिवाय तातुतल्यान गरीबांक मदत जातली हे आसाच.
हिरा: खरे गों? मागीर हांव लग्ना वाढदिवसादिसच संघाकडेन माका जमतां तितले पैसे धाडून दिता. आणी एक स्मारक दवरता.

अफाट दानशूर व्यक्तिमत्वाचा अंत

जुलै महिन्याच्या १४ तारखेस मंगळवारी सूर्य मध्यावर असताना दुपारी २.३० वाजता आषाढ प्रतिपदा लागली व त्याच क्षणी इथे आपल्या जी.एस्.बी. ज्ञातिचा सर्वात दानशूर तारा आपल्यातून निखळला.

कारवारी समाजाबद्दल इतकी आपुलकी बाळगणारा व तळमळीने त्यांचे भले व्हावे या एकाच उद्देशाने झपाटलेला असा नव्वदीच्या घरातला उमदा तरूण (वय ८८) **श्री. अरूण भास्कर कसबेकर** यांना देवाज्ञा झाली.

शेवटच्या क्षणापर्यंत कारवारी ज्ञातिबांधवांच्या उन्नतीसाठी त्यांनी एन्.के.जी.एस्.बी. संघाला व एज्युकेशन सोसायटीला भरभरून देणग्या दिल्या. संघाच्या प्रत्येक कार्यात त्यांनी हिरिरीने आपले सहकार्य केले. कुठेच काही कमी पडू दिले नाही. या त्यांच्या योगदानाबद्दल उचित निर्णय घेत संघाने नोव्हेंबर२०१६च्या वार्षिक स्नेहसंमेलनात ऑनररी मेंबर्सचा बहुमान देत त्यांचा सत्कार केला. तसाच ऑनररी मेंबर म्हणून सत्कार गेल्या वर्षी एज्युकेशन सोसायटीनेही केला.

त्यांनी दिलेल्या देणग्यांची गोळाबेरीज केल्यास जवळजवळ १ कोटी ८६ लाख इतकी भरभक्कम रक्कम त्यांनी संघ आणि एज्युकेशन सोसायटीसाठी दान केली. त्यापैकी २५ लाख देणगी एज्युकेशन सोसायटीसाठी दिली. सदा हसतमुख व इतरांच्या भल्याचाच विचार करून त्यांनी एक उत्तम शिकवण जगापुढे ठेवली. मुंबईत M. SC. (pure mathematics) करतानाच त्यांची ISCO कंपनीत निवड झाली. ६ महिन्यात ते झोनल मॅनेजर (पूर्व भारत) झाले. नंतर मुंबईत येऊन त्यांनी स्वत:ची 'अतुलीन केमिकल्स' नावाची कंपनी पनवेल येथे सुरू केली. त्यांनी व त्यांच्या पत्नी मंगलाताई यांनी अनेक गरीब रुग्णांना नेत्र चिकित्सा व ऑपरेशन्स विनामूल्य करुन दिली.

आपले डीएन व अरुणजी एकाच कारवारच्या हिंदू हायस्कूलमध्ये शिकले. वयाने दोघांमध्ये १ वर्षाचा फरक होता. अरूणजी १ वर्षाने लहान होते. डीएन ७ महिने आधी परलोकवासी झाले तर त्या पाठोपाठ अरुणजींनीही जगाचा निरोप घेतला. त्यांचे ''कवडसे मनाचे'' हे पुस्तक त्यांच्या विविध कलांबद्दल बरेच काही सांगून जाते.

ते कवळे मठ व शांतादुर्गा आईचे निस्सीम भक्त होते. त्यांचा उदार स्वभाव आजच्या नवीन पिढीला नक्कीच अखंडपणे प्रेरणा देत राहील.

अशा थोर विभूतींना मनापासून साष्टांग नमन. ईश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो.

।। ओम् शांतादुर्गे नमोस्तुते ।।

– प्रसाद कसबेकर,संपादक, मुखपत्रिका.

ठाणे मंच आयोजित एक दिवसाची अलिबाग सहल

ठाणे मंच आयोजित दोन रात्री तीन दिवसांची ऑगस्ट पावसाळी सहल (५ते ७ ऑगस्ट २०२६) सिद्धस् रिसॉर्ट,नागांव, अलिबाग येथे संपूर्ण प्रवास ए सी बस मधून करून छान रित्या पार पडली.

पांच तारखेस सकाळी ६वाजता सुटलेली बस दुपारी १वाजता सिद्धस् रिसॉर्टला पोहोचली. प्रत्येक कुटुंबाला एक डबल बेडची रूम दिली होती. छानसे लंच करून सगळे संध्याकाळी ५ वाजता हाऊजी गेम खेळले. त्यात प्रिया कुलकर्णी व शालिनी नाडकर्णी यांना फुल हाऊसचे बक्षीस मिळाले. नंतरचे रात्रीचे भोजन अतिशय उत्कृष्ट होते.

सहा तारखेला सकाळी ९ वाजता उत्तम न्याहारी झाली. त्या नंतर बस मधून सर्वजण बीचवर फेरफटका मारून आले.तिथे काहींनी घोडागाडी मधून सफर ही केली. दुपारचे भोजन ही शाकाहारी तसेच मांसाहारी दोन्ही झकास होते.

संध्याकाळी कार्यक्रमाआधी चहा बरोबर कांदा भजीवर सर्वांनी ताव मारला. कार्यक्रमात ७ जणांनी गाणी म्हटली. त्यांची नावे – मृणाल दळवी, संगीता वाघ, प्रिया थळी, ज्योति सुखटणकर,प्रिया कुलकर्णी, अर्चना वागळे व प्रभात कुलकर्णी अशी आहेत.

प्रमुख पाहुणी म्हणून रिसॉर्टची मालकीण शिल्पा जाधव होत्या. त्यांनी हरिनाम मुखी रंगते, रंगा येई वो, अभी न जाओ छोडकर, पवन दिवानी तसेच माय हार्ट इज बीटींग ही गाणी त्यांच्या अत्यंत मधुर आवाजात गाऊन सर्वांकडून वाहवा मिळवली.

संगीता वाघ यांनी कारवार मधील आपल्या शालेय आठवणी सांगितल्या. देवदास नाडकर्णी यांनी तरूण वयात केलेली 'पहिली भेट' आणि एक फारच छान '' फिलॉसॉफिकल'' कविता वाचून दाखवली. ज्येष्ठ महिलांनी गरबा नृत्य ही केले.

अतुल व अंजली नाडकर्णी ह्यांचे नृत्य सुंदरच झाले.

अर्चना वागळे यांनी आभार प्रदर्शन केले.

नंतर शेवटचा दिवस उजाडला. सकाळी चौलचे श्री रामेश्वर मंदिर बघून,तिथे कित्येकांनी तऱ्हेतऱ्हेचे पोहे विकत घेतले.

दुपारी ग्रुप फोटो घेऊन २.३०वाजता परतीचा प्रवास सुरू केला.

सुरेश पालेकर यांनी व्यवस्था केलेली ३ दिवसांची सहल खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

संध्याकाळ पर्यंत सर्व सभासद सुखद आठवणी घेऊन सुखरूप घरी पोहोचले.

लेखक: उमाकांत का.पालेकर
मोबाईल: ८१०८२९६९१२.

(फोटोज पान ३१ वर)

भगवद्गीता १ ते १८ अध्याय पठण
स्थळ : रामेश्वर मंदिर–संयोजक : संस्कृत भारती सभा

जोगेश्वरीच्या रामेश्वर मंदिरात नेहमीच विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. पुरुषोत्तम मासानिमित्त असाच एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शनिवार दि.१३ जून रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत भगवद्गीतेच्या अठरा अध्यायांचे सामूहिक पठण केले गेले. गीतापठणात ५० हून अधिक भक्तांनी भाग घेतला. सर्वांनी एका सुरात पठण केले. ते खूपच श्रवणीय होते. १८ अध्यायांच्या पठणानंतर संस्कृतभारतीच्या जनपद–संयोजिका सौ.स्वाती वाघ यांनी भक्तीचे महत्व प्रतिपादित करणारी भागवतातील एक कथा सांगितली. शांतिमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम शिस्तीत सुरू झाला आणि उत्तमरित्या पार पडला.

रामेश्वर मंदिर संस्थान आणि संस्कृतभारती यांच्या समन्वयाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

रामेश्वर मंदिराचे पुजारी चंद्रशेखर भटमाम यांचे दुःखद निधन

श्री रामेश्वर मंदिराचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे. श्रावण तोंडावर आहे, सर्व सणवारावेळी त्यांची सतत आठवण येत राहणार. शतक महोत्सवी वर्षातील सर्व उपक्रम आणि मंदिराच्या गेल्या ३०–३५ वर्षातील दैनंदिन पूजाअर्चा सोडून सर्व देवकृत्ये, त्यांच्याच देखरेखीखाली सुरू होती, ते आणि त्यांची टीमच सर्व उत्सव राबवत होती. त्यांच्या सारखा धडपड्या माणूस, परत कधीही न येण्यासाठी आपल्यातून निघून जाणे, ही खूप त्रासदायक बाब आहे. त्यांच्या आत्म्याला शांती लाभो, हीच श्री रामेश्वर चरणी प्रार्थना.

Mangsidesh Investments Pvt. Ltd
Amfi - Registered Mutuual Fund Distributor
1,2,3 Crystal Tower, Gundavali Road no. 3, Off Andheri-Kurla Road, Andheri East, Mumbai 400069 Phone No. +022 69739900 to 9999

Education is every child's right, and every parent's responsibility.

Monthly SIP	Expected Corpus in 15 Yrs	Expected Corpus in 20 Yrs
5,000	₹ 25.22 Lakhs	₹ 49.95 Lakhs
10,000	₹ 50.45 Lakhs	₹ 99.91 Lakhs
15,000	₹ 75.68 Crore	₹1.49 Crore
20,000	₹1 Crore	₹ 1.99 Crore
25,000	₹1.26 Crore	₹ 2.49 Crore

Assuming Rate of Return : 12% p.a



Mutual Fund Investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

मंगेशी, गोवा येथील मंदिराचा सत्कार

अभिमानाची गोष्ट!

गोव्यातील प्रसिद्ध श्री मंगेशी मंदिराला इंडिया टुडे टुरिझम अवॉर्ड २०२६ मध्ये 'सर्वोत्कृष्ट आध्यात्मिक पर्यटन स्थळ' हा मानाचा पुरस्कार मिळाला आहे.

मंदिराचा समृद्ध इतिहास, सांस्कृतिक वारसा आणि आजही टिकून असलेलं आध्यात्मिक महत्त्व यांची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला.

गोवा टुरिझमच्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारण्यात आला.

ही केवळ श्री मंगेशी मंदिराचीच नव्हे, तर गोव्याच्या समृद्ध संस्कृतीची आणि आध्यात्मिक परंपरेचीही गौरवास्पद नोंद आहे.

SHREE HOMOEPATHIC PHARMACY

Wholesale & Retail For : Genuine Indian & Imported Homoepathic Medicines

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane,
Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,
Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)

मुंबई मंच – आनंद मेळावा

रविवार, ३१ जानेवारी २०२७

मुंबई मंच आयोजित आनंद मेळा २०२६ ला तुम्हा सर्वांकडून तसेच स्थानिक रहिवाशांकडून मिळालेल्या उदंड प्रतिसादा बदल आम्ही मुंबई मंच सभासद आपल्या सर्वांचे अत्यंत आभारी आहोत. आम्हाला कळविण्यास आनंद होत आहे की येत्या वर्षी मुंबई मंचने 'आनंद मेळा २०२७' करण्याचे योजिले आहे. आगामी आनंद मेळा २०२७ आपली कलाकृती, व्यवसाय, लघुउद्योग आणि पाककला सर्वांपर्यंत पोहचवण्यासाठी पुन्हा एकदा उत्तम व्यासपीठ ठरणार अशी आशा आहे.

आपण खाली दिलेल्या कोणत्याही प्रकारे यात सहभागी होऊ शकता:

१) खाद्य पदार्थांचा लाईव्ह स्टॉल
२) सुके खाद्य पदार्थ, केक्स, फराळाचे पॅकेज स्टॉल
३) मनोरंजक खेळांचा स्टॉल
४) कलाकुसरीच्या वस्तू, कपडे, पर्सेस, शोभेच्या वस्तू, इतर लघु उद्योग स्टॉल
५) इन्वेस्टमेंटस् स्टॉल
६) प्रायोजक / (Sponsership) स्वतःचे बॅनर, व्यवसाय पत्रिका (Flyer), भित्ती पत्रक.
७) देणगीदार (Donations) : आपल्या ज्ञातीचा हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी आपल्या सढळ आर्थिक मदतीसाठी मुंबई मंच तर्फे नम्र आवाहन.

मेळ्याचा प्राथमिक तपशील पुढील प्रमाणे :

तारीख : रविवार, ३१ जानेवारी २०२७
स्थळ : के.जी.एस सोसायटीचे पटांगण, जोगेश्वरी पूर्व, मुंबई
वेळ : सायंकाळी ४.३० ते ९–३०

स्टॉल बुकींग–१ डिसेंबर २०२६ पासून सुरू (First come first serve basis)

कार्यक्रमात काही बदल झाल्यास स्टॉल होल्डर्सना पूर्व सूचना दिली जाईल–पुढील मुखपत्रिकेत या कार्यक्रमाबद्दल रिमांयडर देण्यात येईल. तुम्हा सर्वांच्या भरघोस प्रतिसादाची अपेक्षा आहे. इच्छुक स्टॉल होल्डर, प्रायोजक आणि देणगीदारांनी मुंबई मंचच्या खाली दिलेल्या सभासदांकडे संपर्क साधावा:

प्रदीप दाभोळकर–९७६४००६३०८	अमित वाघ – ९८२०५ २४३३९
संगीता कसबेकर ९८१९४ १६३३८	मुकुंद नाडकर्णी–९८२०८ ०८३८७
उदय नाडकर्णी. ९६१९५ ९१९१७	प्रसाद गायतोंडे – ९८१९४ ११३३७

श्रावणातले हळदी कुंकु - जोगेश्वरी

२१ऑगस्ट रोजी जोगेश्वरी सरस्वती बाग येथील रामेश्वर मंदिराच्या हॉलमध्ये सायंकाळी ५ ते ७ दरम्यान जवळ जवळ १०० महिलांनी श्रावण महिन्याच्या हळदी कुंकुवाच्या कार्यक्रमाला हजेरी लावून कार्यक्रम यशस्वी केला.
याचे मुख्य श्रेय श्रीमती शांता पालेकर यांना जाते.

फराळामध्ये पंजाबी सामोसा, राजगीऱ्याची चिक्की,जीरा मसाला कोला
व फराळी चिवडा असा बेत होता.

श्रावणातले हळदी कुंकु - ठाणे

श्रावणातला स्नेह मेळावा सौ. सुरेखा पालेकर यांच्या निवास स्थानी शुक्रवार २१ ऑगस्ट रोजी थाटामाटात साजरा झाला. एकूण ३२ भगिनी उपस्थित होत्या. हळदी कुंकुवाचा समारंभ ही प्रथेप्रमाणे गजरे, हरभरे, खोबरे, चणे, खडीसाखर इत्यादी देऊन छान पार पडला.

पंजाबी समोसा, ढोकळा,मोतीचूर लाडु आणि मसाला दूध सर्वांना देण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यात अर्चना वागळे, आश्विनी वाघ, अंजली नाडकर्णी, ज्योति सुखटणकर यांचा हातभार लागला.

- अंजली नाडकर्णी, मुंबई

ठाणे मंच आयोजित एक दिवसाची सहल आणि तिळगूळ समारंभ

तारीख : रविवार, दिनांक १७ जानेवारी २०२७
स्थळ : कळविण्यात येईल
आकार. प्रत्येकी रु ९००/–
भोजनानंतर तिळगूळ समारंभ आयोजित केला जाईल.
जोगेश्वरी, माहीम, ठाणे–मुलुंड येथून बस निघेल.

निराशा टाळण्यासाठी आपली नांवे लगेच नोंदवा.

NKGSB Coop Bank , Naupada, Thane
SB -Code 020100100001816
IFSC Code NKGS0000020
संपर्क..
सुरेश पालेकर 8928850193
राजेश दिवेकर 9619362460
गिरिश रेगे 9922168725

विठ्ठल कामत - क्षुधा तृप्ती करणारा प्रामाणिक माणूस

विठ्ठल कामत यांनी हॉटेल व्यवसायामध्ये जी उंच भरारी घेतली आहे त्या मागे त्यांनी केलेले कष्ट आणि त्यांच्या आईची शिकवण आहे.

बाळाचे पाय पाळण्यात दिसतात, या उक्तीनुसार, लोकांना खाऊ घालणे हा लहानपणापासूनच स्वधर्म मानून, वडिलांच्या पावलांवर पाऊल टाकत, व आईच्या सांगण्यानुसार त्यांनी हॉटेल व्यवसाय निवडला व तो आपल्या हिमतीवर फुलवला, वाढवला. एखादे काम जिद्दीने, प्रामाणिकपणे केले की त्यात यश मिळते याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे विठ्ठल कामत.

माणसाच्या सुखाचा, समाधानाचा रस्ता पोटातून जातो हे वाक्य त्यांनी खरे करून दाखवले. आपल्या हॉटेल मध्ये आलेल्या प्रत्येक माणसाला स्वादिष्ट, रुचकर, पौष्टिक पदार्थ खायला घालून त्यांच्या चेहऱ्यावर समाधान निर्माण करणे हीच विठ्ठल कामत यांच्या यशाची पावती आहे.

कुमार कुणाल (श्री.अनिल नाडकर्णी, अंधेरी यांचा मुलगा)	'वाङ् निश्चय' ३० ऑगस्ट २०२६ रोजी	कुमारी नेहा (श्री.सुब्रमण्यम् कन्नन, अंधेरी यांची मुलगी)

विस्मरणात जाऊ पहाणारे काही खास कारवारी शब्द

मुंबईत स्थायिक झाल्यानंतर कारवारकरांच्या कोकणी भाषेवरील मराठी भाषेचा प्रभाव वाढत गेल्यामुळे मूळचे कारवारी शब्द विसरले जात आहेत. गेल्या दोन-तीन पिढ्या तर मुंबईतच आयुष्य गेल्यामुळे हळूहळू नेहमीच्या वापरातले खास कोकणी शब्द विसरून गेल्यामुळे वाक्यरचना करताना केवळ क्रियापद तेवढे कोकणी ठेवून बोलतात. आजवरच्या आयुष्यात (अवघे पाऊणशे वयमान) आजी, आई, सासरे, सासूबाई या वडीलधाऱ्यांच्या तोंडून जी कोकणी बोली ऐकली ती बसल्या ठिकाणी आठवते आहे. ती नव्या पिढीपर्यंत त्यांच्या आई-वडिलांच्या करवी पोहोचती करावीशी वाटली म्हणून हा रिकामपणाचा उद्योग. ज्यांना हे शब्द अगोदरच वापरून सवय आहे, त्यांनाही यातून पुन:प्रत्ययाचा आनंद मिळावा. कोणताही क्रम न घेता जसजसे शब्द सुचले तसे लिहिले आहेत.

१) **बाय**-या शब्दाचे दोन अर्थ आहेत.१) विहीर २) घरातल्या सर्वात मोठ्या मुलीला 'बाय' या नावाने हाक मारायची एकेकाळी पद्धत होती.

२) **तानेक**-कोणत्याही पेयाला (जे तहान शमवते त्याला) तानेक हा खास शब्द वापरला जातो. उदा. कषाय, चहा, कॉफी, सरबत इत्यादी.

३) **हासहुर्श**-हा एकप्रकारचा औषधी काढा आहे. जिरे भांड्यात कोरडेच भाजून (फडफडवून) त्यात पाणी ओतून ते आटवतात व साखर घालून काढा करून तो गरम असतानाच प्यायला देतात. पोटात गॅस (वायू) धरल्यामुळे अस्वस्थता वाटते, त्यावर रामबाण इलाज. विशेषत: गर्भवतीचे दिवस भरत येण्याच्या दिवसात अशी अस्वस्थता संध्याकाळच्या वेळेला जाणवते. अशावेळी हमखास उपयोगाचा.

४) **गजरे आणि गजऱ्या पालॉ**-गजरे म्हणजे बैठ्या खेळातले सागरगोटे. गजऱ्या पालॉ - सागरगोट्याच्या झाडाची पाने. त्यांचा रस हा पोटातले जंतनाशक म्हणून किंवा रक्तशुद्धीसाठी पूर्वी विहिरीचे पाणी पिणाऱ्यांना उपयोगी औषध असे. जसे कडूकिराईत(काडेचिराईत मराठीत) वापरतात तसाच. चवीला कडूझार असायचा.

५) **पातळ गॉड**- म्हणजे गुळाची काकवी. ढेप बनण्या अगोदरची प्रथमावस्था. हे पातळ गॉड, पोळे, आंबोळ्यांबरोबर चटणीच्या ऐवजी खातात. लहान मुलांना हा पदार्थ त्यातील लोहगुणामुळे खास करून चपातीबरोबर रोज दिला जात असे.

६) **कोबू किंवा कब्बू आणि कॉबारोस** - कोबू म्हणजे ऊस आणि उसाचा रस.

७) **करबेला पालॉ** - फोडणीचा पाला किंवा कढीपत्ता.

८) **कोथिंबीर (कोथमिर)**-म्हणजे धणे, कोथिंबिरीच्या बिया आणि कोथिंबिरीच्या हिरव्या पानांना कोकणीत आवर्जून कोथिंबिरी किंवा कोथमिरी पालॉ असेच म्हणतात.

९) **कारातॅ**-म्हणजे कारले. कारात्या किसमूर म्हणजे कारल्याची कोशिंबीर.

१०) **कणंग**-म्हणजे रताळे

११) **चिबूड** : म्हणजे खरबूज. चिबूडा ईशाळे म्हणजे पिकलेल्या खरबुजाची नारळाच्या दुधातली कच्ची खीर (शिकरण म्हणा हवे तर)

१२)**चाकॉ**-भाजीसाठी वापरण्यात येणारा कच्चा फणस.कोवळ्या चाक्याचा'सुशेल'हा भाजीसारखा तोंडी लावण्याचा पदार्थ.

-शैलजा मंगेश नाडकर्णी, शिवाजी पार्क-९८२०१७९३८५

=:=:=:=:=

कोंकणी भाषेतील काही म्हणी आणि वाक्प्रचार

१) **अनवाळॅ** म्हणजे सोवळे

२) **बडी** म्हणजे काठी

हे दोन्ही शब्द एकत्र झाले की अनवाळ्याबडी हा स्वतंत्र शब्द तयार होतो. याचा साधा सरळ अर्थ म्हणजे धुणे वाळत घालायची काठी. मिश्किलपणाने, कुचिंद्रीपणाने कारवारकर एखाद्या उंच आणि खूपच सडपातळ असलेल्या मुलीला 'अनवाळ्याबडी' म्हणतात.

३) **पॅडावण** म्हणजे मोदकपात्र. इडल्यांचे पीठ पूर्वी वाटीत घालून त्या वाट्या पेडावणात ठेवून उकडत असत. हे पात्र सहसा तांब्याचे असायचे. त्याचा आकार गोलमटोल असायचा. या गरगरीत आकारावरून लठ्ठ बाईला पॅडावण म्हणतात. ''लग्नापैली अनवाळ्याबडी आशिल्ली - ती - चली आता लग्न जाल्या लगायत पॅडावण जाल्या मगो!''

४) **बुयाँव** म्हणजे मोठी साठवणाची चिनी मातीची बरणी. यात वर्षभराची चिंच, सोले, लोणची साठवून ठेवत असत. बरणीच्या मोठ्या आकारावरून लठ्ठ बाईचा उल्लेख कुचिंद्रीपणाने बुयाँव असा करतात. पु. ल. देशपांड्यांच्या 'गणगोत' मध्ये त्यांची आजी 'बाय' हिने बुयाँव शांता हे नाव आपल्या मैत्रिणीला ठेवले आहे. पॅडावणाला समानार्थी शब्द म्हणाना.

५) **उजॉ** म्हणजे आग, विस्तव ''शेगडेक उजॉ पेटय किंवा घाल.'' या अर्थाने वाक्यात वापरला जातो. मात्र भांडणे, लावालाव्या करणाऱ्याला उद्देशून ''फक्कत (फक्त) उजॉ लायत भोवता'' म्हणतात.

६) **कुड** म्हणजे खोली (room). हा शब्द त्या त्या खोलीच्या वापरानुसार निरनिराळ्या नावाने वापरतात. गावाकडील जुन्या घरांमध्ये अशाप्रकारच्या खोल्या (कुडी) असत.

अ) दॅवाकूड म्हणजे देवघर.

ब) रांची कूड (रांधची कूड) म्हणजे स्वयंपाकघर.

क) काळखा कूड म्हणजे माजघराशेजारची अंधारी खोली.

ही खास करून बाळ-बाळंतिणीसाठी असायची. ती आड बाजूला असल्यामुळे बाळ बाळंतिणीचे तेलपाणी, शेकशेगडी वगैरे सोपस्कार निवांतपणे व्हायचे. एरवी 'बायकांचा खलबतखाना' म्हणूनही या खोलीचा वापर होत असे.

७) **फाती**, म्हणजे मुलींच्या केसांची तीन पेडी किंवा पाच पेडी (कोकणीत पोडी म्हणतात.) वेणी. याचे फात्यो हे बहुवचन आहे. फुलां फाती म्हणजे फुलांची गुंफलेली वेणी.

८) **आपुडता** (क्रियापद) म्हणजे हात लावणे, शिवणे. वाक्यात उपयोग याप्रमाणे होतो. ''ती माका आपुडता.'' किंवा ''माका आपुड नाका.

९) **गुणकुळॉ**. म्हणजे गोल आकाराचा, वाटोळा. यावरून झालेला वाक्प्रचार 'गुणकुळॉ जालो.' ''आपल्याली तारीफ आयकून तॉ गुणकुळॉ जावन आयलॉ.''

१०) रागार जालॉ, जाली (क्रियापद) म्हणजे रागावला, रागावली. ''हांवे तागेले उलैयिल्ले **आयकले ना** म्हण तो मजेर रागार जालॉ'' ''ती मजेर रागारजाली.''

११) **भोवती भगीरथ** (भगीरथी) म्हणजे भटकभवानी.

१२) **'मूस'** (पुल्लिंगी) म्हणजे माशी. यावरून झालेला वाक्प्रचार

अ) 'मूस मारता' म्हणजे रिकामटेकडा माशा मारत बसला आहे.

ब) 'गुवावैलो मूस' म्हणजे एकाजागी स्वस्थपणे न बसता या जागेवरून त्या जागेवर,या

दुकानातून त्या दुकानात हुंगत भटकणाऱ्या व्यक्तीला उद्देशून केलेला वाक्प्रचार.

१३) **'पिसॉ'**. म्हणजे वेडा. यावरून आलेला वाक्प्रचार म्हणजे 'पिश्याभूत'. तद्दन बावळटपणा करणाऱ्याला उद्देशून हा खास शब्द वापरतात. (७०-७५ वर्षांपूर्वी माझ्या आजोबांच्या तोंडून ऐकलेला वाक्प्रचार.)

१४) **खॅतं.** म्हणजे माकडाची छोटी जात किंवा माकडाचे पिल्लू. 'खुट्याक खॅतं' किंवा 'खुट्याक माकड' या वाक्प्रचाराचा अर्थ म्हणजे गरज नसताना सोबतीला जाऊन तिथे निरर्थक बसून रहाणे. ''हांवे कित्याक थंय तुजेबरोबर खुट्याक खॅत्यावरी येवचे? मगेले काम नासताना?''

१५)**शिंशिंबीरी आयली** म्हणजे एखादे किळसवाणे दृश्य पाहून किंवा शिजवलेल्या पदार्थाच्या असह्य अशा उग्र वासाने अंगावर काटा येणे.

१६)**''भिऊन गुळॉ जालॉ.''** म्हणजे भीतीने पाचावर धारण बसणे.

१७) **''हासून गुळॉ जालॉ.''** म्हणजे हसून लोटपोट होणे.

१८) **फुलां माळची किंवा फुलां माळप.** एखाद्या स्त्रीकडून आपले काही काम करून घ्यायचे असेल तर तिला खूष करण्यासाठी तिची तोंडाने स्तुती करून किंवा तिच्या आवडीच्या गोष्टी तिला बहाल करून तिच्याकडून आपले काम साधून घेणे.

१९) **कोंबार काढचे** (काढप) म्हणजे फुलां माळप सारखाच अर्थ, मात्र हा वाक्प्रचार पुरुषाच्या बाबतीत जास्त करून वापरतात. अर्थात हा स्त्री आणि पुरुष दोघांनाही लागू पडतो. अर्थ तोच. म्हणजे खूष करण्यासाठी येन केन प्रकारे प्रयत्न करणे.

यामागे आपल्या कारवारकरांची एक प्रथा आहे. पूर्वीच्या काळी पहिल्या दिवाळसणाला किंवा संसार पाडव्याला (गुढीपाडवा) जावयाला सासुरवाडीला येण्यासाठी आमंत्रण द्यायला मुलीच्या सासरी जाताना मुलीचे वडील किंवा भावाबरोबर टोपली भरून मोड काढलेले मूग (मुगा कोंब) सासरघरी त्यांचा मान राखण्यासाठी पाठवीत असत. सासरच्यांना खूष ठेवण्यासाठी धाडलेले 'मुगा कोंब' यावरून 'ताका कोंबार काढले' हा वाक्प्रचार तयार झाला असावा, हे थोडे विषयांतर झाले असले, तरी नव्या पिढीला या प्रथेची माहिती असावी म्हणून ते केले आहे.

२०) **माथ्यार म्हारू बसप.** म्हणजे डोक्यावर भूत बसणे. एखादी व्यक्ती विक्षिप्तपणाने वागून कधी त्रागा करायला, भलते सलते बोलायला वागायला लागली की ''तागेल्या माथ्यार म्हारू बसला'' असे म्हणतात. यात लहान मुलांनी हट्टापायी केलेले आकांडतांडवही आले.

२१) **' किरान किर्रर्र कॅलॅ.'** म्हणजे एखाद्या गंभीर विषयावर चर्चा मसलत चालली असताना कोणी दीड शहाणा मध्येच पचकला किंवा शंका काढू लागला की त्याला उद्देशून ''जालॅ ! किरान किर्रर्र कॅलॅ.'' असे म्हणतात. कीर म्हणजे पोपट. त्याला मध्येच कधीतरी असा विचित्र आवाज काढायची सवय असते.

२२) **'कवड उघडे आणि न्हाणेक बूच.'** म्हणजे घराचे दार (चोरासाठी) सताड उघडे आणि उंदीर, साप, झुरळे यांना प्रतिबंध करण्यासाठी न्हाणीघराच्या दाराचा, जाळीचा बंदोबस्त करणे. म्हणजे एका गोष्टीची काळजी घेतेवेळी मुख्य गोष्टीकडे दुर्लक्ष करणे.

अशाप्रकारे आणखी पुष्कळ अर्थपूर्ण वाक्प्रचार आणि म्हणींचा ठेवा आपल्या कोकणी बोलीभाषेत आहे. ज्यांना माहीत असेल त्यांनी याचा परिचय आपल्या नव्या पिढीला करून द्यावा आणि मातृभाषेची खुमारी उलगडून दाखवावी ही विनंती.

– शैलजा मंगेश नाडकर्णी,शिवाजी पार्क, मुंबई,
मोबाईल नंबर : ९८२०१७९३८५

=:=:=:=:=:=:=

'सर्वप्रथम सेवा' याची व्याप्ती

मुंबईमध्ये हजारो हौसिंग सोसायट्या, टॉवर्स, इंडस्ट्रीयल इस्टेटस् वगैरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन म्हणजे एक डोकेदुखी व मनस्ताप असतो. भाडी गोळा करणे, बँकेत भरणा करणे, पाणी/वीज/प्रॉपर्टी टॅक्स यांची बिले भरणे, माळी, सुरक्षा, लिफ्टमन यांच्यावर देखरेख ठेवणे, दुरुस्ती देखभाल करणे, हिशेब ठेवणे अशी अनेक कामे असतात. कार्यकारिणीचे सभासद म्हणून कुणाला रहायचे नसते, जे मारून मुटकून सभासद होतात त्यांना वेळ नसतो. आम्ही ही सगळी ए टू झेड कामे करण्याची जबाबदारी घेतो. आमच्याजवळ सध्या अनेक संस्थांची कामे आहेत. त्यांत टाटा हाऊसिंग, लक्ष्मी इंडस्ट्रीयलसारख्या मातब्बर संस्था आहेत. त्याशिवाय लघु उद्योग सुरू करण्यासाठी आमच्याजवळ नोंदविलेले अनेक ट्रेड मार्क्स आहेत.

उद्दिष्ट : सेवा पुरविण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची आवाश्यकता आहे. इच्छुक ज्ञाति बांधवानी आमच्याशी संपर्क साधावा. त्यांना अर्थार्जन करण्यासाठी आम्ही साहाय्य करू तसेच आमच्या ट्रेड मार्क्सच्याद्वारे व्यवसाय सुरू करण्यासाठी आम्ही मार्गदर्शन करू. ज्ञातिबांधवांची सेवा हेही आमचे उद्दिष्ट आहे.

संपर्क : न. अ. जोशी : ९८१९३०४५९९/९९२०४०४५९९

पत्रव्यवहाराचा पत्ता : पोस्ट बॉक्स ११९९०, आझादनगर पोस्ट ऑफीस,
अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३.

SERVICE FIRST®

SOCIETY SERVICE RESOURCE
समाजसेवा समृद्धि

98193 04599 99204 04599

सर्वप्रथम सेवा®

SOCIETY SERVICE RESOURCE

कारवार तालुका मराठी नाट्य कलाकार संघटनेची स्थापना

कारवार तालुक्यातील सदाशिवगड येथील श्री साईप्रेम सभागृहात कारवार तालुक्यातील मराठी रंगभूमी कलाकारांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला कारवार तालुक्यातील वेगवेगळ्या खेड्यातील शेकडो मराठी नाट्यकलाकार उपस्थित होते. बैठकीच्या वेळी कारवार तालुका मराठी नाट्यकलाकार संघटनेची स्थापना करण्यात आली आणि संघटनेचे उद्घाटनही करण्यात आले.

यावेळी अतिथी या नात्याने कीर्तनकार, सुप्रसिद्ध गायक आणि ज्येष्ठ नाट्यकलाकार दिनेश गडकर जातीने उपस्थित होते. अध्यक्षपदी श्रीनिवास सावंत (माजाळी), ज्येष्ठ क्रिकेटपटू, नाट्य दिग्दर्शक आणि नाट्यकलाकार सुभाष पेडणेकर यांची उपाध्यक्षपदी, सचिवपदी देवीदास नाईक, उपसचिवपदी दीपक नाईक, खजिनदारपदी साईनाथ मंत्री, उपखजिनदारपदी गोपीचंद पडवळकर यांची निवड करण्यात आली.

बैठकीचे औचित्य साधून आनंद नाईक (नंदनगड), सुभाष पेडणेकर (सदाशिवगड), डॉ. प्रज्योत महाळे (असनोटी) गजानन शेटकर (कणसगिरी) यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांची समयोचित भाषणे झाली. बैठकीला नंदकिशोर नाईक, दिपक बावा, शिवानंद नाईक, गणपती नाईकसह अनेक नाट्यप्रेमी आणि नाट्यकलाकार उपस्थित होते. श्रीनिवास सावंत यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. दरम्यान काळाची गरज ओळखून कारवार तालुक्यातील मराठी रंगभूमी कलाकारांची संघटना अस्तित्वात आल्याने तालुक्यातील नाट्यक्षेत्रात समाधानाचे वातावरण पसरले आहे.

मुंबईतील भगिनींच्या तिळगूळ समारंभाबाबत सूचना (मकरसक्रांतीच्या आसपास)

आपल्या ज्ञातीतील मुंबईच्या सर्व भगिनींना नम्र विनंती आहे की २०२७ च्या जानेवारी महिन्यात दरवर्षी आपण करत असलेला (मकरसंक्रांतीच्या आसपासचा) तिळगूळ समारंभ यंदाही जानेवारी २०२७ ला करावयाचा आहे. समारंभाचे ठिकाण गेल्या वर्षीप्रमाणेच माहीम येथील 'मिराज लँडस्केप टॉवर'मध्ये आहे. आमची विशेषकरून माटुंगा-दादर-माहीम येथे रहात असलेल्या आपल्या भगिनींना विनंती आहे की आपण या कार्यक्रमाची जबाबदारी उत्स्फूर्तपणे व हिरीरीने स्वीकारावी, त्याप्रमाणे कार्यक्रमासाठी लागावयाच्या सर्व वस्तू, भेटी, तसेच चहा, पाणी, फराळाची व्यवस्था करावी. तुमची कार्यक्रमाची तारीख पक्की झाली की संपादक-मुखपत्रिका यांना कळवावी त्याप्रमाणे जानेवारीच्या मुखपत्रिकेच्या अंकात आम्ही ती घालू व सर्व ज्ञाती भगिनींना निमंत्रित करू. कार्यक्रमाचा जो काही खर्च असेल तो संघ अध्यक्षांना कळवावा. त्याची व्यवस्था करण्यात येईल. तरी हा कार्यक्रम यशस्वीरीत्या आपण सर्व भगिनी मिळून कराल अशी आशा करतो.

आपला नम्र,

प्रसाद कसबेकर, संपादक मुखपत्रिका (मो. ९८२०५०१५५१)

पौरोहित्यात आधुनिक संकल्पना रुजविणारे श्रीकुमार सरज्योतिषी

भारतीय माणूस मुळातच सश्रद्ध आहे. दैनंदिन पूजा, नैमित्तिक पूजा हा भारतीय कुटुंबव्यवस्थेचा अविभाज्य भागच आहे. पण पौरोहित्याच्या कामात कालानुरूप बदल केले नाहीत, तर हे पूजाविधी केवळ उपचार म्हणून केले जाऊ शकतात. विधीमागील उद्देश समजावून सांगणे अतिशय महत्त्वाचे असते. भारतीय हिंदू समाजाच्या आध्यात्मिक परंपरेचा पाया म्हणजे सनातन वैदिक संस्कार. देवतापूजन, उपासना आणि पूजा पद्धती हा एकूणच भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळेच आपल्याकडे पौरोहित्याला महत्त्व आहे. पौरोहित्य हे पूर्वापार अत्यंत प्रतिष्ठेचे काम मानले जाते. आजही हे काम करणाऱ्यांना मान-प्रतिष्ठा आहे. आपल्या घराण्यातील पौरोहित्याची परंपरा समर्थपणे सांभाळत आधुनिक काळानुसार त्यात नावीन्यपूर्वक बदल करणारे आणि कालानुसंगत. पूजा सांगणारे गुरुजी म्हणून गोव्यात ख्याती असलेले श्रीकुमार सरज्योतिषी म्हणूनच या व्यवसायातील वैशिष्ट्यपूर्ण नाव ठरते.

पौरोहित्य आणि संस्कृतचे सखोल शिक्षण

गोव्यातील प्रसिद्ध श्री शांतादुर्गा मंदिरातील पुरोहित वेदमूर्ती श्री शांताराम वि. सरज्योतिषी यांचे चिरंजीव श्रीकुमार सरज्योतिषी यांचा जन्म २३ जुलै १९६६ रोजी झाला. त्यांचे सातवीपर्यंतचे शिक्षण गोव्यात झाले. पुढे मुंबईत बहिस्थ विद्यार्थी म्हणून ते दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांनी कै. वे. मु. हरिभाऊ बोरकर यांच्याकडे चार वर्षे पौरोहित्याचे रीतसर शिक्षण घेतले. पं. शिकेरकर गुरुजी यांच्याकडे त्यांनी संस्कृत शिक्षण घेतले. त्यानंतर पुण्यातील वेदशास्त्रोत्तेजक सभेची साहित्य विशारद परीक्षा ते उत्तीर्ण झाले. दरम्यान, कुटुंबावर झालेल्या आघातानंतर त्यांचे शिक्षण थांबले.

शांतादुर्गा देवस्थानचे पुरोहित

कालांतराने त्यांच्या वडिलांना वृद्धापकाळाने ऐकायला कमी येऊ लागले आणि हळूहळू मंदिरातील कामाची संपूर्ण जबाबदारी श्रीकुमार यांच्यावर पडली. त्यांनी ती समर्थपणे पेलली. श्रीकुमार शांताराम सरज्योतिषी हे आता प्रसिद्ध अशा शांतादुर्गा देवस्थान, कवळे येथे मुख्य पुरोहित म्हणून काम पाहत आहे. पौरोहित्य करण्याबरोबर जोड व्यवसाय म्हणून त्यांनी पे फोन आणि कुमार ट्रॅव्हल एजन्सी सुरू केली. हा व्यवसाय एवढाच दृष्टिकोन डोळ्यांसमोर न ठेवता परगावहून श्री शांतादुर्गा देवीच्या सेवेसाठी येणाऱ्या भक्तांच्या सोयीसाठी होता.

कालसुसंगत पौरोहित्य

काळानुसार बदलायला हवे या विचारातून विधी केवळ नावाला पार न पाडता लोकांना तो समजावून सांगणे फार महत्त्वाचे असते, हे जाणून सरज्योतिषी गुरुजी आजच्या काळातील उदाहरणे देत विधी समजावून सांगतात. काळाला सुसंगत ज्ञानाची, वचनांची पेरणी केल्यामुळे सरज्योतिषी यांच्या कामाला वेगळी ओळख मिळाली आहे.

सरज्योतिषी कुटुंब हे गोव्यातील संघ परिवारापैकी एक. त्यामुळे साहजिकच सामाजिक कामाची प्रेरणा आणि घरातही सतत संघ, विश्व हिंदू परिषद, मातृछाया इत्यादी संस्थांच्या कार्यकर्त्यांच्या बैठका होत, त्यातून सामाजिक कामाची गोडी लागली.

शांती पूजेचे महत्त्व

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत, जेथे प्रत्येक जण कामाच्या ताणात आणि धावपळीत असतो, तेथे शांती पूजा महत्त्वाची ठरते. शांती पूजा म्हणजे केवळ धार्मिक विधी नाही, तर मानसिक आणि शारीरिक शांती मिळविण्याची एक पद्धत आहे, असे सरज्योतिषी सांगतात. शांती पूजेने मन शांत होते आणि नकारात्मक विचार कमी होतात. शांती पूजेने सकारात्मक ऊर्जा मिळण्यास मदत होते. यामुळे जीवनात उत्साह टिकून राहतो. शरीर आणि मन शुद्ध होते. त्यातून उत्तम आरोग्य प्राप्त होते. घरात सुख आणि समृद्धी टिकून राहते. शांती पूजेने आत्मिक ज्ञान वाढते आणि जीवनाला एक नवीन दृष्टिकोन मिळतो. शांती पूजेला आधुनिक जीवनशैलीत महत्त्व आहे. कारण ती धावपळीच्या जीवनात शांती आणि संतुलन साधायला मदत करते. आधुनिक जीवनशैलीत, अनेकदा कामांवर आणि जबाबदाऱ्यांवर लक्ष केंद्रित केले जाते. शांती पूजा जीवनात संतुलन साधायला आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवायला मदत करते, असे गुरुजी सांगतात.

''आजही आमचे कुटुंब पौरोहित्य हा नुसता व्यवसाय म्हणून विचार न करता, येणाऱ्या महाजन भक्तांच्या कल्याणासाठी श्री शांतादुर्गा देवीच्या आशीर्वादाने आम्हाला लाभलेली सेवेची संधी आहे, असाच आमचा एकमेव दृष्टिकोन आहे,'' असे श्रीकुमार सरज्योतिषी आवर्जून सांगतात.

पूजेतील आनंद आणि परंपरा

देवतांची पूजा आणि उपासना मनाला तसेच बुद्धीला अपार आनंद देणारा अनुभव आहे. त्यातून होणारे एका प्रकारचे ध्यान आणि पूजेमध्ये रममाण होणे, हा अत्युच्च आनंद आहे. वैयक्तिक पूजा आणि सामूहिक पूजा पारंपारिक ज्ञानाच्या आधारे विकसित होत गेल्या. त्यातूनच पूजा आणि उपासना तंत्रातील तज्ज्ञ असणारे पुरोहित किंवा गुरुजी परंपरेच्या आधारानेच पूजा सांगतात. वेदपाठशाळेतून खडतर प्रशिक्षण घेतलेले पुरोहित आजही जुनी भारतीय परंपरा पुढे विकसित करीत निरंतर सुरू ठेवतात.

पौरोहित्याचे काम आजही प्रतिष्ठेचे

इतर क्षेत्रात नोकरी, करिअर करून पौरोहित्य करणारे अनेक जण असल्याने पूजा सांगणे, करणे हेच पूर्ण वेळ करिअर होऊ शकते, हा विचारच आजवर फारसा झालेला नव्हता. गुरुजी भटजींना सतत मागणी असते. मंगळागौर, सत्यनारायण, गणेशोत्सव यांची पूजा सांगायला गुरुजींना मोठी मागणी असते. हल्ली पूजा सांगण्यासाठी किंवा श्रींची प्रतिष्ठापना करण्यासाठी रेकॉर्डेड पूजा, आरतीच्या सीडी असल्या, तरी गुरुजींनी प्रत्यक्ष घरी येऊन पूजा सांगण्यासाठीचा आग्रह कायम आहे. त्यामुळे पौरोहित्य करणाऱ्यांची तर या काळात प्रचंड धावपळ असते. पौरोहित्याची आवड असणारी तरुण मंडळी या सेवेत येऊ शकतात. पौरोहित्याच्या आधारावर एखाद्या कुटुंबाचा उदरनिर्वाह देखील होऊ शकतो, असे श्रीकुमार सरज्योतिषी आवर्जून सांगतात. हे काम आजही प्रतिष्ठेचे आहे, असे ते मानतात.

स्नेहपूर्ण श्रद्धांजली

समर्पित जीवनाचा अंत

।। देव बरे करू ।।

जन्म: ७.१.१९३७ मृत्यु, १८.१२.२०२५

१८.१२.२६ रोजी आपले सर्वांचे आवडते व्यक्तिमत्व परमपूज्य दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांना श्री. मंगेश चरणी विलीन होऊन एक वर्ष पूर्ण होत आहे.

४५ वर्षे ज्यांनी संघाची मुखपत्रिका अविरत चालवली, जिला जीवापाड जोपासले त्या मुखपत्रिकेचे निर्माते व सर्वेसर्वा आज आपल्यात नाहीत.

अशा बुद्धिवादी आणि कर्मयोगी विभूतीला, ज्यांनी निरामय सेवेचा आदर्श उभा केला, त्यांना अंत:करणपूर्वक नम्र श्रद्धांजली.

- वर्धन दत्तात्रय नाडकर्णी – पुत्र प्रसाद मोहन कसबेकर (शिष्य)

ज्ञातीतील सभासदांना निवेदन

एन्. के. जी. एस्. बी. संघ परिवार

महोदय/महोदया,

आज ८० व्या स्वातंत्र दिनाचे औचित्य साधून आपणास विनंती करतो की The N K G S B संघ आपणास नित्यनेमाने त्रैमासिक पाठवून आपल्या समाजाबद्दल लोकांबद्दल माहिती देवून समाजातील बांधवाना एकत्र ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. आज मुंबई शहर, ठाणे, पुणे ,बंगलोर व उपनगरे कारवार, अंकोला, मंगळूर ते पार केरळापर्यंत व भारतभर तसेच, USA, UK, AUSTRALIA, UAE, GERMANY, JAPAN या देशात काम व व्यवसाय निमित्ताने अंदाजे १० लाखांच्या वर NKGSB कुटुंबे राहत असून NKGSB संघात त्यांची पूर्ण माहिती उपलब्ध नाही व ते करण्याचा प्रयत्न आहे. आंतरजातीय विवाह केलेल्या कुटुंबासाठी पत्नी कवळे मठाची अनुयायी असेल तर ती सभासद होऊ शकते. पती कवळे मठाचा अनुयायी असेल तर तो व मुले सभासद होऊ शकतात. आम्ही आपणास विनंती करतो की आपली व आपल्या भारतात व परदेशात राहणाऱ्या कुटुंबीयांची सविस्तर माहिती द्यावी तसेच आपले नातेवाईक, जवळ राहणाऱ्या NKGSB कुटुंबाला कळवून त्यांची माहिती उपलब्ध करून द्यावी अथवा nkgsbs@gmail.com वर ई-मेल करणे अथवा ९८६७६७४८६४ वर WhatsApp करणे. कृपया पूर्ण पत्ता व पिनकोड मोबाईल नंबर ई-मेल, अत्यंत जरुरी आहे.

आपण विनामूल्य माहिती लेख पाठवू शकता संपादकाच्या संमतीने ते प्रकाशित केले जातील. तसेच आपल्या सूचना पाठविणे ज्या संघाच्या कामकाज सुधारण्यास उपयुक्त ठरू शकतात संघासाठी काम करु इच्छिणाऱ्या व्यक्तींनी आपली नावे जरूर द्यावीत.

आपण सभासद नसल्यास सभासद व्हावे ही विनंती. संघ व सोसायटीच्या आर्थिक लाभ घेणाऱ्या वृद्ध सेवा, वैद्यकीय साहाय्य SSA NONSSA शैक्षणिक अर्थ साहाय्य, मुखपत्रिका घेणाऱ्या सर्व कुटुंबास, पती पत्नी व १६ वर्षे वरील मुलांना सभासद होण्यासाठी प्रवृत्त करावे अशी विनंती आहे. प्रत्येकी संघ किंवा सोसायटीसाठी रु. १००० फक्त एकदाच भरावे. सभासद होण्यासाठी खालील प्रमाणे फॉर्म वेबसाईटवर उपलब्ध असून तो भरणे जरुरी आहे. फॉर्म बरोबर चेकने NKGSB संघाचे ऑफिस मध्ये कुरियरने वरील पत्यावर पाठविणे किंवा जवळच्या NKGSB कॉ-ऑप बँकच्या शाखेत भरावे किंवा ओंन लाईन पेमेंट करणे. Bank : NKGSB Co-op bank Ltd, Girgam ,Branch, Account : NKGSB Sangh, Accont No. : 002100100001371, IFC Code: nkgs0000002

शहरातील कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. १५,००,००० पेक्षा कमी असल्यास शहरात न राहणाऱ्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.१०,००,००० पेक्षा कमी असल्यास वृद्ध सेवा, वैद्यकीय साहाय्य, SSA, NONSSA, व इतर अडचणीसाठी अर्थ साहाय्य मिळण्यासाठी पात्र असून उत्पन्नाचा दाखला, तसेच इतर कागदपत्रे देणे जरुरी आहे.आम्ही आपणास विनंती करतो की सढळ हाताने देणगी द्यावी ज्यामुळे संघाच्या सामाजिक कामास हातभार लागेल.

आम्ही जाहिरात स्वीकारतो. कृपया सविस्तर माहितीसाठी ९८२०५०१५५१ फोन करणे किंवा **nksgbs@gmail.com** इ मेल करणे. आम्हाला खात्री आहे की आपण आमच्या विनंतीस मान देऊन सभासद होणार व माहिती, देणगी पाठवाल.धन्यवाद !

– वामन नाडकर्णी (ऑनररी सेक्रेटरी)

=:=:=:=:=:=:=:=:=

बोटांच्या रेषांचे दैवी रहस्य

१. मानवाच्या बोटांच्या रेषा गर्भावस्थेच्या चौथ्या महिन्यापासून तयार होऊ लागतात. त्या वेळी मूल बाह्य जगापासून खूप दूर असते, तरीसुद्धा त्याची ओळख देणारी भाषा त्याच्या शरीरावर लिहिली जात असते.

२. या रेषांची रचना आपल्या DNA-च्या सूचनांनुसार होते; पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे या रेषा ना आई-वडिलांसारख्या असतात, ना पूर्वजांशी जुळणाऱ्या असतात.

३. जणू एखाद्या अदृश्य रेडिओ तरंगांच्या प्रभावाने या रेषा त्वचेवर आपोआप उमटतात. ज्या एखाद्या अलौकिक व्यवस्थेकडे इशारा करतात.

४. प्रत्येक व्यक्तीच्या बोटांच्या रेषा संपूर्ण जगात पूर्णपणे वेगळ्या असतात; आणि आजवर असा एकही मनुष्य जन्माला आलेला नाही की ज्याच्या फिंगरप्रिंट्स् अगदी दुसऱ्याशी तंतोतंत जुळतात.

५. यावरून हे सिद्ध होते की एक अद्वितीय 'कलाकार' आहे, जो प्रत्येक वेळी एक नवी कलाकृती घडवतो.

६. जेव्हा जगातील सर्वात मोठा संगणकसुद्धा अशी रचना तयार करू शकत नाही, तेव्हा हे म्हणणे चुकीचे ठरणार नाही की ही रचना मानवी बुद्धीपलीकडची आहे.

७. प्रश्न हा उभा राहतो की माझ्यासारखी निर्मिती कोण करू शकतो हा प्रश्न त्या अदृश्य कारागिराच्या कलेला सलाम करतो.

८. एखादी दुर्घटना घडली, त्वचा भाजली किंवा रेषा नष्ट झाल्या, तरी कालांतराने अगदी तशाच रेषा पुन्हा जशाच्या तशा परत येतात. ना एक पेशी इकडे-तिकडे, ना रचनेत बदल.

९. यावरून दिसून येते की या रेषा केवळ त्वचेवर नाहीत, तर अस्तित्वाच्या अधिक खोल पातळीवर कोरलेल्या असतात. एक प्रकारची आत्मिय प्रतिमा.

१०. मानवी शरीराचा दुसरा कोणताही भाग असा नाही की जो पूर्णपणे तसाच पुन्हा निर्माण होऊ शकेल; पण फिंगरप्रिंट्स् हा अपवाद आहे. ही एखाद्या दैवी योजनेची झलक आहे.

११. आजतागायत विज्ञान या रहस्याचा पूर्ण उलगडा करू शकलेले नाही. याला 'बायोलॉजिकल मेमरी' किंवा 'सेल्युलर इंटेलिजन्स' असे म्हणतात; परंतु आध्यात्मिक दृष्टिकोनातून ही आत्म्याची ओळख आहे.

१२. या रेषांमधील वळणे, फांद्या, वर्तुळे हे सगळे एका खास भाषेत लिहिलेले कोड आहेत, जे केवळ त्यांच्या निर्मात्यालाच समजतात.

१३. फिंगरप्रिंट्स् केवळ ओळखीचे साधन नसून, ब्रह्मांडाचे नियम आणि आपल्या कर्मांची कहाणीही त्यात सामावलेली आहे.

१४. आजवर कोणतेही तंत्रज्ञान, कोणतेही आर्टिफिशियल इंटेलिजन्स किंवा प्रयोगशाळा अशा रेषा निर्माण करू शकलेली नाही, ज्या खऱ्या अर्थाने पूर्णतः युनिक असतील.

१५. अनेक परंपरा या रेषांना 'ईश्वराची भाषा' मानतात; म्हणूनच हस्तरेखा विद्या आजही प्रासंगिक आणि चमत्कारी मानली जाते.

१६. जर आपली ओळख जन्मापूर्वीच ठरलेली असेल, तर आपले जीवनही कदाचित एखाद्या ‘दैवी स्क्रिप्ट’नुसारच चालत असावे.

१७. जेव्हा विज्ञान थकते तेव्हा अध्यात्म सांगते, कोणी तरी आहे, जो हे सगळे चालवत आहे. तो पाहतो आहे, समजून घेत आहे आणि निर्माण करीत आहे.

१८. जर निसर्ग इतका सूक्ष्म आणि परिपूर्ण असू शकतो, तर निसर्गामागे एखादी सर्वोच्च चेतना नक्कीच आहे. जिला भारतीय तत्त्वज्ञान ‘ब्रह्म’ म्हणते.

१९. प्रत्येक फिंगरप्रिंट हा एक‘ईश्वरी पासवर्ड’ आहे, जो फक्त त्यालाच माहीत आहे, ज्याने आपल्याला घडवले आहे.

२०. म्हणून शेवटी तोच प्रश्न उरतो, त्या कलाकाराची बरोबरी कोणी करू शकते का? उत्तर स्पष्ट आहे. नाही! तो एकमेव आहे, जो प्रत्येक वेळी, प्रत्येक देहावर एक नवी स्वाक्षरी रचतो; आणि तोच सृष्टीकर्ता आहे.

बोटांच्या रेषा हे सिद्ध करतात की त्यांचे अस्तित्व प्रत्येक व्यक्तीला एक अद्वितीय ओळख देते जी ब्रह्मांडाच्या अनंत सृष्टीचे एक हस्ताक्षर असते.

हे वैशिष्ट्य केवळ शरीरापुरते मर्यादित नाही; ते आत्म्यापर्यंत विस्तारलेले आहे.

आपण आस्तिक असो वा नास्तिक, त्या दैवी परम चेतनेचे अस्तित्व आणि सत्ता मान्य करावीच लागते.

हिंदू धर्मीय याच अदृश्य व सर्वोच्च शक्तीची उपासना करतात. कधी मूर्तिपूजक म्हणून, तर कधी नास्तिक म्हणूनही.

***

Dr. Viraj N. Gandbhir (Ortho surgeon) recently operated a 99 years old lady for her knee ball. Her grandson writes as under-" I am Bhaavin A. Mehta. Dr. Viraj is an excellent surgeon as well as a humble person to connect with. Ball replacement done by him of my Grand mother of age 99.I can say to everyone Dr. Viraj N. Gandbhir is the best for Ortho.Thanks."

***

(गेल्या अंकात दिल्याप्रमाणे या अंकापासून ज्ञातीतील १५ वर्षा खालील मुलांसाठी चित्रकला/गोष्टी लिहिण्याचे आवाहन करण्यात आले होते त्यानुसार हे सदर प्रस्तुत करीत आहोत.)

वर्ग ७ वी मधील १२ वर्षीय साईशा कसबेकरने काढलेली चित्रे

CLAUSTROPHOBIC

Hundreds of people surrounded me, happy and bouncing. A loud chatter filled the air, brimming with excitement. But I was the only one who closed my eyes.
I struggled against the shackles binding my hands. Soft skin curled around the metal, followed by a piercing pain. I didn't scream. I didn't whimper. I didn't produce a single sound because I was so close. My gaze stayed where I wanted it to. A small slit on the concrete wall. A small slit with sunlight pouring out of it. Freedom. I lunged against the thick rope tying me to a chair. I lunged, again and again. My eyes flapped open, drinking in the crowd beside me. A rough arm pushed me to the side. Was it safer to stay here? In real life? I pictured the gap in the wall, then closed my eyes again. I was gasping for air. Sweat trickled down my neck, cold in the warm air. Heart thudding against my rib cage, I reached my right hand as close as I could to the gap.
One. More. Inch.
The metal pierced my wrist, then I let out an ear-splitting scream. The chatter of people muffled my scream. The clueless people marched forward, oblivious to their surroundings. I could feel the ghost of the shackles still lingering on my wrists. Though, I didn't mind too much. I was so close. I lunged again, the light as close as it never was. I almost crawled. I almost crumbled, but I never gave up. Finally, my hand closed around the slit, and the crowd disappeared.

- Saisha Kasbekar



ठाणे मंच आयोजित...

आपल्या समाजातील कवी श्री. देवदास नाडकर्णी यांच्याशी संवाद साधतील सौ. संगीता वाघ आणि सौ. विद्या धुमे. त्यानंतर विविध नृत्याचे आविष्कार सादर करण्यात येतील.

तारीख : रविवार, १३ डिसेंबर २०२६
वेळ : सकाळी ११ वाजल्यापासून
स्थळ : तेंडुलकर हॉल, माहीम

जोगेश्वरी, ठाणे–मुलुंड येथून बस निघेल.

आपल्या समाजात ज्या कलाकारांना नृत्यकला सादर करावयाची असेल त्यांनी आपली नावे लगेच कळवावी. वयाची अट नाही.

संपर्क :

सुरेश पालेकर ८९२८८५०१९३
राजेश दिवेकर ९६१९३६२४६०
गिरिश रेगे ९९२२१६८७२५

संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या (मागील अंकानंतर) उल्लेखनीय देणग्या

१ वरळी येथे रहाणाऱ्या डॉ. वैशाली दडकर (पूर्वाश्रमीच्या शकुंतला मंगेश गंडभीर) या एम.डी. असून त्यांनी आईवडिल, श्रीमती राधाबाई व श्री मंगेश गणबा गंडभीर यांच्या नावे वृद्ध सेवा निधीस रु. १ लाखाची देणगी दिली आहे. तसेच त्यांची दादरला रहाणारी दिवंगत बहीण, श्रीमती इंदूमती गुरुदास फेणे जी अतिशय सुस्वभावी व परोपकारी होती तिच्या नावे संघास रु. ५०,०००/– ची देणगी दिली आहे.

त्याचप्रमाणे आईवडिलांच्या नावे एज्युकेशन सोसायटीस रु. ७५,०००/–ची देणगी दिली आहे.

संघास मिळालेल्या देणग्या

१.	श्रीमती शांता व श्री. वासुदेव जनार्दन कामत यांच्या स्मरणार्थ कामत कुटुंबीयांतर्फे	२५,०००
२.	श्री. जिवबा नागेश सरदेसाई यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती आशा यांजकडून	२५,०००
३.	श्रीमती इंदूमती गुरुदास फेणे यांच्या स्मरणार्थ बहीण डॉ. वैशाली नंदकुमार दडकर यांजकडून	५०,०००

वृद्ध सेवा निधीसाठी

१.	श्रीमती राधाबाई व श्री मंगेश गणबा गंडभीर यांच्या स्मरणार्थ कन्या डॉ. वैशाली नंदकुमार दडकर यांजकडून	१,००,०००
२.	सासूसासरे श्रीमती सुनिती व श्री मंगेश गोविंद मुळगावकर तसेच आईवडिल श्रीमती उमाबाई श्री. प्रभाकर यशवंत तेलंग यांच्या स्मरणार्थ श्री. सुषमा सुबोध मुळगांवकर यांजकडून	१०,०००
३.	श्रीमती निर्मला व श्री. शंकर श्रीपाद तेलंग यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती शुभदा व पुत्र श्री. अजित यांजकडून	२१,०००
४.	श्रीमती प्रभा व श्री. पुरुषोत्तम भास्कर वाघ यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती विद्या दिलीप पै यांजकडून	२०,०००
५.	श्री. आशुतोष पुरुषोत्तम बोरकर यांच्या ८३ व्या जयंतीच्या स्मरणार्थ त्यांची कन्या श्रीमती चारुता बोरकर यांजकडून	४६,८००

एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

१.	डॉ. विनायक बाबुराव नाडकर्णी (बाबन) यांच्या जन्मशताब्दी निमित्त पुत्र श्री. मोरेश्वर यांजकडून	५,०००
२.	श्रीमती राधाबाई व श्री. मंगेश गणबा गंडभीर यांच्या स्मरणार्थ कन्या डॉ. वैशाली नंदकुमार दडकर यांजकडून कन्या	७५,०००

अरुण भास्कर कसबेकर यांच्या “ **कवडसे मनाचे** ” ह्या पुस्तकाला वाचकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. तरी अजून ज्यांना हे पुस्तक विकत घ्यावयाचे असेल त्यांनी NKGSB SANGH च्या Office मध्ये संपर्क साधावा.

ऑफीस फोन नंबर मुखपत्रिकेच्या कव्हर पेजवर दिला आहे. धन्यवाद.

।। कालाय तस्मै नमः ।।

	नाव	सध्याचे ठिकाण
१.	श्रीमती अरुणा श्रीपाद दुभाषी	पारले
२.	श्री विजय भालचंद्र दिवेकर	मुलुंड
३.	श्री अरुण भास्कर कसबेकर	चर्चगेट
४.	श्रीमती नूतन विजय कामत (पूर्वाश्रमीची नूतन सदानंद नाडकर्णी)	माहीम
५.	श्री. नागेश नीलकंठ नेत्रावळी	अंकोला
६.	श्रीमती मालिनी उमाकांत नाडकर्णी	महालक्ष्मी
७.	श्रीमती माधुरी राजेश नेत्रावळी	अंबरनाथ
८.	श्रीमती सुलभा विनय(मोरेश्वर) नाडकर्णी	पुणे
९.	डॉ. रमेश सदाशिव सलगर	जोगेश्वरी
१०.	श्री विजय वासुदेव सबनीस	माहीम
११.	श्री दिनेश महारुद्र हिचकड	विरार
१२.	श्री. उमेश गजानन वागळे	पारले

=:=:=:=:: =:=:=:=::

A name that spells its class !
WINOVER CATERERS
Marriages, Thread Ceremonies,
Engagement and Birthday Parties Etc.
WE DELIVER FOOD / SNACKS FOR
PARTIES AT HOME
Take away and TIFFINS Or opt for Ala-carte
Amchi food and Variety cuisines
ALL OVER MUMBAI-THANE-VIRAR
Call or Whatsapp for our take away menu
Vinod Kaval / Ashwini / Rupali
98208 43392 / 90048 41198 / 98923 00608
Shop No. 4, Andrea Apartment off Azad Road, Vile Parle East, Mumbai - 400 057